# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 466/2020** **दिनांक: 03 /06/2020**

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020 No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020
5. संचालक, सिटी हॉस्पीटल अकोला यांचे पत्र दि. 03/06/2020

जिल्हाधिकारी अकोला यांचे कार्यालय सत्यमेव जयते

**संस्थात्मक अलगीकरण केंद्रासाठी हॉटेल रणजीत इमारतीला परवानगी देणेबाबत.**

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2, 3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे, **आणि**

**ज्याअर्थी,** संदर्भीय पत्र क्र. 5 अन्वये संचालक, सिटी हॉस्पीटल, रामदासपेठ अकोला यांनी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्गदर्शक सुचनानुसार कोविड -19 ची कमी प्रमाणात लक्षणे असलेल्या रुग्णांचे अलगीकरणाकरीता, संस्थात्मक अलगीकरण केंद्र चालविण्याकरीता परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार संचालक, सिटी हॉस्पीटल, रामदासपेठ अकोला यांनी केलेल्या विनंतीचे अनुषंगाने त्यांना हॉटेल रणजीत नविन बसस्थानकामागे अकोला येथे शुल्क आकारणी करुन (On Payment Basis) वर **संस्थात्मक अलगीकरण केंद्र** चालविण्याकरीता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून आवश्यक ते परवानगी देण्यात येत आहे.

1. अलगीकरण केंद्रामध्ये त्यांनी ICMR यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.
2. महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश तसेच मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
3. अलगीकरण केंद्र हे हॉटेल रणजीत, नविन बस स्थानकामागे, अकोला येथे राहील. त्यामध्ये 28 बेडची व्यवस्था राहील. एकाच कुटुंबातील अधिक रुग्ण असल्यास क्षमता वाढू शकते.
4. या सेंटरमध्ये रुग्णांचे उपचारार्थ लागणारा पुरेशा प्रमाणातील तज्ञ डॉक्टर व कर्मचारी / अधिकारी वर्ग 24 x 7 नियमीतपणे उपस्थित ठेवावा लागेल.
5. संचालक सिटी हॉस्पीटल यांनी कळविल्याप्रमाणे पल्स ऑक्झीमिटर, व्हर्चुअल असिस्टंट अँड मॉनीटरींग, टेलीफोनीक व्हीडीओ कॉल सुविधा या पुरविणे आवश्यक राहील.

6. तसेच N-95 मास्क, डिजिटल थर्मामिटर, अत्यावश्यक सेवा ह्या 24 x 7 पुरविणे आवश्यक राहील.
7. अलगीकरण केंद्रामध्ये दाखल केलेल्या रुग्णांना ते घेत असलेल्या सोई सुविधांकरीता नियमानुसार माफक शुल्क आकारण्यांत यावे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय

(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)
*जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी*
*अकोला*

***प्रतिलिपी :-***

1. मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीस्तव सादर.
2. जिल्हा शल्य चिकीत्सक अकोला
3. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला
4. जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोला
5. आयुक्त, महानगरपालिका, अकोला
6. उपविभागीय अधिकारी, अकोला
7. श्री. दिपक केळकर, संचालक सिटी हॉस्पीटल, रामदासपेठ, अकोला

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**